# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

❖ **मिरा भाईदर महानगरपालिका मा. आयुक्त यांनी सकाळी ८.०० वाजता केली जेसल पार्क परिसराची पाहणी**

आज दिनांक २७ डिसेंबर २०२४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी सकाळी ८.०० वाजता जेसल पार्क येथील बालाजी खेळाचे मैदान, ओपन जिम, व्हॉलीबॉल मैदान, गुलाब बाग, योगसाधना शेड येथे स्थळ पाहणी करून आढावा घेतला. पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त (उद्यान) कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबित, उद्यान अधिक्षक व महापालिका कर्मचारी उपस्थित होते.

मैदानात खेळणारे खेळाडू, ओपन जिम सामग्री वापरणाऱ्या महिला यांची मा. आयुक्त यांनी भेट घेत, त्यांच्यासोबत एकंदरीत जेसल पार्क मध्ये उद्भवणाऱ्या समस्यांबाबत चर्चा केली. मैदानात खेळताना मोठ्या दगडींमुळे लहान मुले पडून कोणतीही गंभीर दुखापत होऊ नये यासाठी पूर्ण मैदानातील दगडी उचलून स्वच्छता करण्याचे निर्देश मा. आयुक्त यांनी दिले. मैदानात असलेल्या स्टेजची स्वच्छता तसेच डागडुजी करण्याच्या सूचना मा. आयुक्त यांनी दिल्या. महिलांसाठी असलेले ओपन जिम सामग्री या तपासून आवश्यकता असल्यास तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश मा. आयुक्त यांनी दिले. व्हॉलीबॉल खेळाडूंसाठी समांतर असे सिमेंट कॉंक्रिटचे प्लॅटफॉर्म तयार करून त्यावर रेती ऐवजी उकृष्ट दर्जाची वाळू टाकण्याची तात्काळ कारवाई करण्याचे निर्देशित केले. तसेच सूचना केल्याप्रमाणे सर्व कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी संबंधित अधिकारी व ठेकेदारांना निर्देशित केले आहे.

अतिरिक्त आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका